भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३७१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०७/२०१८

**१) मोबाईलची चोरी: --**

दिनांक २०/०७/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा पिंपळगाव सडक येथे आठवडी बाजाराला गेला असता त्या दरम्यान त्याचा खिशात ठेवलेला १ ओपो ए--७१ मोबाईल कि. १०,५००/रु. चा चोरीला गेला असुन इतर दोन इसम १) इकबाल अहमद खान यांचा विवो व्हि ५३ कंपनीचा मोबाईल कि. १०,२००/रु, २) चितांजन खुशालजी मेश्राम यांचा मेश्राम यांचा एमआय वाय १ कंपनीचा मोबाईल कि. १५,७२५/रु. आसा एकुण ३६,४२५/रु. चा माल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेल्याने फिर्यादी मोरेश्वर प्रेमदास मेश्राम रा. धाबेटेकडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणा वरून भांडण करून विटाचे तुकडयाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:**

दिनांक १८/०७/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा मित्रासह मुकेश्वर जगनाडे याचे घरा जवळ बसला असता यातील आरोपी क्र. १ व २ त्याचे कडे जावुन आरोपी क्र. १ ने 'तु देवनाथ यास ब्लिचींग पावडर मागनारा होतोस' कोण असे बोलुन लाथाने, हाताने तसेच विटाचे तुकडयाने डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी महेश उर्फ अमित शालीक तुमसरे वय २५ वर्ष रा. गोंडसावरी यांचे बयाण व एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३) ट्रकच्या धडकेत दोन जखमी : --**

दिनांक २१/०७/२०१८ चे १८.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी व तिचा पती मंगेश मेश्राम हे मोटार सायकल क्र. एमएच ४९ एडब्यु ५७४० ने नागपुर वरून साकोली कडे एनएच ०६ रोडने जात असता यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक हयगयीने लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला मागेहुन धडक मारून फिर्यादी व तिचा पती याला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सौ. निकीता मंगेश मेश्राम वय २१ वर्ष रा. खंडाळा ह.मु. नागपुर हिचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंध्दीमेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) निष्काळजीपणे ट्रक चालवुन गाडीतील क्लिनर यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद: --**

दिनांक २१/०७/२०१८ चे ०१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे ट्रकचे क्लच फेल झाल्याने त्याचे ट्रक क्र. एमएच ४० एटी १०५७ हा रोडवर लावुन येणारे जाणारे वाहनांना इसारा करीत असता यातील आरोपी चालाने त्याचे ताब्यातील ट्रक हयगयीने लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन मागील बाजुस धडक देवन त्याचे गाडीतील क्लिनर यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व ट्रकचे नुकशानी झाल्याने फिर्यादी ज्ञानेश्वर चैतराम कोसरकर वय २५ वर्ष रा. डोंगरगाव यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) ईमेल आयडी हॅक केल्याने गुन्हा नोंद: --**

दिनांक २६/०६/२०१८ ते आज पावे तो यातील फिर्यादीने त्याचा E-mail id fecebooks physiotherapy या ग्रुपवर, कामा निमीत्य शेअर केले असता कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फिर्यादी व तिचे आई चा E-mail id हॅक केला अशा फिर्यादीचे कु. स्नेहा रूषी राऊत वय ३७ वर्ष रा समता नगर मेंढा रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ६६(सी) माहीती तंत्रज्ञान कायदा. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.नी.चव्हाण पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) विना परवानगीने दंडाधीकारी भंडारा यांचे कक्षात प्रवेश करून गोपनीयता भंग करण्याचा उद्देशाने मोबाईलने संभासणाची व्हिडीओ रिकॉर्डींग केल्याने गुन्हा नोंदः --**

दिनांक २१/०७/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने मा. उपवीभागीय अधीकारी तथा दंडाधीकारी सा. भंडारा यांचे कक्षात रेतीचे प्रकरणाची सुनावनी सुरू असतांना आरोपीचा प्रकरणाची सुनावणी सरू असतांना आरोपीचा प्रकरणाशी कोणताही संबध नसतांनाही विना परवानगीने प्रवेश करून गोपनीयता भंग करण्याचा उद्देशाने त्याचे अॅनराइड मोबाईलने संभासणाची व्हिडीओ रिकॉर्डींग केले अशा सरतर्फे फिर्यादी प्रवीण सत्नाकर महिरे वय ३५ वर्ष रा. उपवीभागीय अधीकारी तथा दंडाधीकारी भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३ शासकीय गुपीते अधीनीयम १९२३ सहकलम १२० मपोका.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. गोखले पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंदः --**

दिनांक २१/०७/२०१८ चे १८.१० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही वडीलाचे घरची लाईट गेल्याने कनेक्शन वायरला कार्बन चडल्याचे कारणा वरून त्यास ब्रश मारत असतांना यातील आरोपी हा चौकात रोडवर सार्वजनीक ठिकाणी जावुन फिर्यादीस तु नेहमी ताराला कशाला ब्रश मारतेस असे बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून गालावर २--३ थापड मारून पुन्हा मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम -२९४,३२३,५०६ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**८) अल्पवयीन मुलगी घरून निघुन गेल्याने गुन्हा नोंदः --**

दिनांक २१/०७/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ही घरी कुणालाही न सांगता निघुन गेली अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन दिघोरी करीत आहेत.

**९) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्युः --**

दिनांक २०/०६/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. कमलाबाई रामकृष्ण हर्षे वय ५५ वर्ष, रा. दहेगाव ही तिचे घरी चक्कर येवुन पडल्याने तिच्या डोक्याला दुखापत होवुन तिला औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारादरम्यान दि. ०५/०७/२०१८ चे १६४५ वा. मरण पावल्याने पो.स्टे. अजनी येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना. चाचेरे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उईके पोलीस स्टेशन दिघारी हे करीत आहेत.

**१०) उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु : --**

दिनांक २५/०६/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. मंगला मिताराम कोरे वय ४८ वर्ष, रा. ब्रम्हपुरी चंद्रपुर ही पायदळ रोड क्रॉस करीता असता हिला अज्ञात मोटार सायकल चालकाने धडक दिल्याने तिचे डोक्याला मार लागुन तिला लक्ष हॉस्पीटल भंडारा नंतर मेडीकल कॉजेल नागपुर येथे उपचारा करीता भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौचे कगदपत्र पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. चेटुले पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**११) उपचारा दरम्यान युवकांचा मृत्यु : --**

दिनांक २१/०७/२०१८ चे ०८.०० वा ते १३.०० वाजता दरम्यान यातील मृतक मुकेश मंगलमुर्ती मानकर वय २७ वर्ष, रा. कुडेगाव हा त्याचे शेतावर पारे (मेरा) मारुन घरी परत आला असता अचानक प्रकृती बिघडल्याने फिर्यादीने त्याला उपचाराकरीता ग्रामीण रुग्नालय लाखांदुर येथे भरती केले असता डॉ. नी चेक करुन काही तरी चावल्याने उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी पुरुषोत्तम मंगलमुर्ती मानकर वय २९ वर्ष, रा. कुडेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. भोयर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**१२) ईसमाचा मृत्यु : --**

दिनांक २०/०७/२०१८ चे २३.४० वाजता दरम्यान यातील मृतक केशव धर्मा दिवटे वय ५० वर्ष, रा. पुयार यास ग्रामीण रूग्नालय लाखांदुर येथे भरती केले असता तेथील डॉ. ने तपासुन मरण पावल्याचे घोषीत केल्याने डॉ. फिर्यादी सौ. कवीता सिताराम पांडे वय ३६ वर्ष रा. लाखांदुर यांचे रिपोर्ट व डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. शेंडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.